## प्रकरण - तिसरे

# ‘बळिवंत’ मधील आशय व आकृतिबंध

# प्रकरण – तिसरे

# 'बळिवंत' मधील आशय व आकृतिबंध

## १. प्रस्तावना :-

'बळिवंत' हा श्रीकांत देशमुख यांचा पहिलाच कवितासंग्रह असून तो १९९७ साली प्रसिद्ध झाला आहे. प्रस्तुत कवितासंग्रहात एकूण ६२ कविता असून त्या दोन विभागात समाविष्ट आहेत. त्यातील प्रत्येक कवितेचा बारकाईने अभ्यास करून या काव्यसंग्रहातून व्यक्त झालेल्या कृषिसंस्कृतीचे स्वरूप कोणते ? कृषिजनसमुहाच्या दु:खाची नेमकी कारणे कोणती ? शेतकऱ्यांच्या जगण्यात येणाऱ्या नेमक्या अडचणी कोणत्या ? कृषिजनसमुहातील स्त्रीच्या वाट्याला आलेल्या जगण्याचे स्वरूप कोणते? याशिवाय कवितेचा घाट, आकृतिबंध, आविष्कारशैली कोणत्या प्रकारची आहे ? आणि या सर्व विवेचनातून जे निष्कर्ष हाती येतील ते मांडण्याचा विनम्र प्रयत्न या प्रस्तुत प्रकरणात केला जाणार आहे.

## २. कवी परिचय :-

कवी श्रीकांत देशमुख हे १९८० नंतरच्या तिसऱ्या पिढीतील एक कणखर मनाचे आणि कृषिजन-संस्कृतीचे समग्र भान आणि जाण असणारे कवी आहेत. श्रीकांत देशमुख हे मराठवाड्यातील असून त्यांचे नांदेड शहरात वास्तव्य आहे. मूळ शेतकरी कुटुंबात जन्मलेले परंतु नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने शेतीपासून दूर गेलेले कवी देशमुख आपल्या शेतीविषयी, शेतकऱ्यांविषयी आणि परिसराविषयी नेहमी कवितेतून बोलत असतात. ''देशमुख हे गावोगांवच्या कवीसंमेलनात दिसणारे कवी नाहीत. त्याचबरोबर माध्यमांच्या जवळपास वावरणारेही कवी नाहीत. कविता हा वाङ्मयप्रकार गंभीरपणे हाताळणारे व स्वत:ची जीवनदृष्टी असणारे कवी आहेत.''[१] असे भाष्य नागनाथ कोतापल्ले यांनी त्यांच्याविषयी केले आहे. कवी देशमुख यांच्या 'बळिवंत' मधून कृषिजनसमुहाचा समग्र आविष्कार प्रतीत झाला आहे.

## ३. वाङ्मयीन कर्तृत्व :-

कवी श्रीकांत देशमुख हे फारसे गाजावाजा नसलेले परंतु आपल्या थोडक्याच कलाकृतींनी ग्रामीण कवितेचा प्रवाह समृद्ध करणारे ते एक नव्या पिढीतील सजग कवी आहेत. कवी देशमुख यांनी विपुल साहित्याची निर्मिती केली नाही. परंतु जे अल्प साहित्य निर्मिले त्या साहित्यानेच त्यांना मानाचे स्थान मिळवून दिले. कवी देशमुख यांचे दोन कवितासंग्रह, एक वैचारिक ग्रंथ, एक समिक्षात्मक ग्रंथ प्रसिद्ध आहे. आपला गाव, गावातील माणसं, परिसर, शेतीभाती, निसर्ग, पशू, पक्षी, प्राणी हे त्यांच्या

जिव्हाळ्याचे विषय आहेत. या घटकांच्या जवळ जाण्यासाठी, त्यांच्याशी हितगुज करण्यासाठी त्यांना कविताच साहाय्य करते. म्हणून 'कविता' हा त्यांचा आवडता प्रांत आहे. कवी देशमुख यांचे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यामध्ये 'बळिवंत' (१९९७) व 'आषाढमाती' यांचा समावेश होतो. तर याशिवाय 'महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ' हा वैचारिक ग्रंथ तर 'महानोरांची कविता' हा समिक्षात्मक ग्रंथही प्रसिद्ध आहे.

मोजकेच पण कसदार लेखन करणारे देशमुख हे अनेक पुरस्काराने सन्मानित आहेत. त्यांना औरंगाबाद येथील 'बी रघुनाथ पुरस्कार', प्रवरानगर येथील 'विखे-पाटील पुरस्कार', जालना येथील 'राजा हरिश्चंद्र साहनी दु:खी पुरस्कार', औरंगाबाद येथील 'मराठवाडा साहित्य परिषदेचा पुरस्कार', मुंबई येथील मानाचा 'महाराष्ट्र फाऊंडेशन पुरस्कार' इ. पुरस्कार त्यांना प्राप्त आहेत. या पुरस्काराच्या नावावरूनच त्यांच्या प्रगल्भ व्यक्तीमत्त्वाची आणि कसदार काव्यकर्तृत्वाची प्रचिती येते.

## ४. 'बळिवंत' या शीर्षकाची यथार्थता :-

फार वर्षापूर्वीची एक लोककथा आहे. शेतकरी हा एक राजा होता. तो दानशूर आणि उदार मनाचा होता. एकदा ब्राह्मण त्याला दान मागण्यासाठी आला, बळिराजा म्हणाला जे तुला हवे आहे. ते माग मी द्यायला तयार आहे. त्या दुष्ट ब्राह्मणाने त्याला साडेतीन पाऊलांची जागा मागितली. त्यावर शेतकऱ्याने त्याची मागणी स्वीकारत तुला हवी असेल त्याठिकाणची जागा घे असे सांगितले. त्यानंतर ब्राह्मणाने एक पाऊल स्वर्गात टाकले, दुसरे पृथ्वीवर टाकले, तिसरे पाताळात टाकले. अर्धे पाऊल टाकायला जागाच शिल्लक राहिली नाही. अशावेळी अर्धं पाऊल माझ्या मस्तकावर ठेव असे सांगतो. त्या दुष्ट ब्राह्मणाने अर्ध पाऊल शेतकऱ्याच्या मस्तकावर ठेवले. त्यामुळे शेतकऱ्याचा पाताळात 'बळी' गेला. शेतकऱ्याचा बळी गेला म्हणून तो 'बळिराजा' असे नामाभिधान त्याला प्राप्त झाले. अशा पारंपरिक अर्थाने 'बळी' गेलेल्या आणि आजच्या आधुनिक व्यवस्थेने 'बळी' घेतलेल्या बळिवंताचे दु:ख, कष्ट, त्यांच्या इच्छा, आकांक्षा, हर्ष, खेद, प्रेम या गोष्टी 'बळिवंत' मधून प्रतीत करण्याचा कवीचा मानस आहे. हीच या शीर्षकाची यथार्थता होय.

'बळिवंत' मधील आशय यामध्ये - बारमाही राबणारा बळिराजा, शेतकरी बापाची झालेली ससेहोलपट, फरफट, गाव-शिवाराचा समग्र आविष्कार, महाराष्ट्रातील सांस्कृतिक संचिताचा आविष्कार, समंजस, सोशिक, विद्रोही व दातृत्ववान बाप, गावापासून तुटलेपणाची अन् त्यातून आलेल्या एकाकीपणाची जाणीव, बळिराजाचे दु:ख व वेदना, पाऊस हाच सर्वस्व, कृषिजनसमुहातील स्त्रीच्या

वाट्याला आलेले जगण्याचे स्वरूप, बळिवंत : पशु, पक्षी, प्राणी यांचे दर्शन, बळिराजाचा आशावादी दृष्टिकोन, मरेपर्यंत शेत आणि मरणोत्तरही शेतच हीच बळिराजाची अखेरची इच्छा इ. मुद्यांच्या आधारे मांडला आहे.

'बळिवंत' मधील आकृतिबंध मध्ये -'बळिवंत' मधील आकृतिबंध समग्र कृषिव्यवस्थेला उभं करणारा, 'बळिवंत' मधील आकृतिबंध बदलत्या खेड्याचा वेध घेणारा, 'बळिवंत' मधील आकृतिबंध ग्रामीण जीवनातील दु:ख आर्ततेने व्यक्त करणारा, 'बळिवंत' मधील आकृतिबंध जुन्या चालीरिती नष्ट होत चालल्याची जाणीव व्यक्त करणारा, 'बळिवंत' मधील आकृतिबंध विचाराबरोबरच चिंतनशीलतेला प्राधान्य देणारा, 'बळिवंत' मधील आकृतिबंधातून संत साहित्य व लोकसाहित्याला स्पर्श, 'बळिवंत'मधील प्रतिमा व प्रतीके, 'बळिवंत' मधील आविष्कार स्वरूप इ. मुद्यांच्या आधारे मांडला आहे.

## ५. 'बळिवंत' मधील आशय :-

### ५.१ बारमाही राबणारा बळिराजा :-

विश्वाचा पोशिंदा असलेला बळिराजा आपल्या शिवारात अखंडपणे दिवसरात्र राबत असतो. बळिराजाच्या या राबण्याला ना अंत असतो ना शेवट असतो. त्याचं आपलं बारमाही राबणं सुरूच असते. बळिराजाच्या जीवनात निसर्गाची अवकृपा, अनियमित पाऊस, दुष्काळ या गोष्टी त्याला सदैव उद्ध्वस्थ करून टाकत असतात. तरीही राबणे, खपणे आणि भरडणे हेच आपलं जगणं आहे असे समजून तो शिवारात बारमाही राबत असतो. कवी श्रीकांत देशमुख यांनी 'बारमाही', 'पाहिलं आहे', 'आला पाऊस शिवेत', 'आम्हा घरी तण', 'पावलांचा माथा', 'आम्ही पिकवतो माल', 'बळिवंत आम्ही' इ. कवितांतून बळिवंताचे बारमाही राबणे चित्रीत केले आहे.

'बारमाही' ह्या कवितेमध्ये बारमाही राबणाऱ्या बळिराजाचे सोशिकपण अधोरेखीत केले आहे. बळिराजाच्या राबण्याला ठराविक असा हंगाम नसतो. 'बारमाही राबणे' हाच त्याचा हंगाम असतो. म्हणून त्याने हंगामाच्या दिवसाची चौकशी करू नये. कारण राबण्यासाठी त्याच्याकडे ठराविक असा दिवस नसतोच. अव्याहत राबणे एवढेच त्याच्या नशिबी असते. म्हणूनच बैलामधील आणि त्याच्यामधील फरक येथे उरत नाही.

**''बारमाही राबणाऱ्या जीवानं, पुसू नयेत दिवस हंगामाचे**
**बुडतो दिवस कोणत्या मावळतीला, घेऊ नये अंदाज याचा**
**बैल ओढतो मोट ओढावं आयुष्य तसंच**
**हंबरू नये बैलानं थारोळ्यातल्या पाण्याच्या नावानं''** (पृ.११)

नागनाथ कोतापल्ले म्हणतात - ''येथे हंगामाच्या दिवसाची चौकशी करायची नाही. कारण हंगाम त्याच्यासाठी नसतोच. दिवस उगवतो कधी आणि मावळतो कधी याचीही चौकशी करता कामा नये. कारण दिवस त्याच्या केवळ राबण्यासाठीच असतो. शेवटी ज्या बैलासोबत राबतो त्याच्यामध्ये आणि बैलामध्ये अंतरच उरत नाही. या दोघांनाही पाणी थारोळ्याच्या रूपात दिसते.''[२] बळिराजाचे राबणे कवी देशमुखांनी अचूकपणे टिपले आहे.

'आला पाऊस शिवेत' ह्या कवितेत राबणाऱ्या बापाचं संपूर्ण आयुष्यच काबाडाचा भाग कसं बनतं हे चित्रीत केले आहे. शिवारात राबणाऱ्या बापाच्या काबाडाचं मोल काय ? तर ढेकळाचा धनी. असं हे बापाचं ढेकळासारखेच कोरडं खरखरीत आणि रखरखीत जीवन आहे. म्हणूनच देशमुखांना हा शेतकरी बाप धुऱ्यांवर वाळलेल्या जुन्या वडासारखा दिसतो.

**ढेकळाचा धनी बाप** **केलं जीवाचं काबाड**
**धुऱ्यांवर उभा जसा** **वाळलेला जुना वड** (पृ. ५३)

बापाचे हे रखरखीत जीवन वाचकांच्या जीवाला रूखरूख लावून जातं.

याच कवितेत सालगडी म्हणून राबणारा बाप मातीत राबता राबता रानातली माती होतो. रानातल्या मातीवर प्रेम करणारा, तिच्यावर निष्ठा ठेवणारा बाप उद्ध्वस्थ होतो. तेव्हा त्याचे हे उद्ध्वस्थ होणे एकूणच वाचकांच्या हृदयाला पीळ पाडते.

**बाप माझा सालगडी** **ठेका मातीचा घेतला**
**माती रचता रचता** **रानातली माती झाला** पृ.५३)

देशमुखांची कविता राबणाऱ्यावर निष्ठा असणाऱ्यांची अन् राबता राबता नष्ट होणाऱ्या माणसांची कविता होते.

'आम्हा घरी तण' ह्या कवितेमध्ये शिवारात श्रमाची पूजा बांधणारा अन् ती कधीही न चुकवणारा बाप आयुष्याच्या शेवटच्या टप्प्याला येतो. तरीही त्याचे दारिद्रय संपत नाही. बापाच्या घराचा धुंडाळा घेतला तर खापराच्या भांड्याशिवाय काहीच सापडत नाही. बापाच्या उभ्या जन्माची कमाई काय ? खापराची भांडी. तीही वाडवडिलांची.

**खापराचे भांडे**
**दारात फुटले**
**आयुष्य आटले** **सांजवेळी** (पृ. ५७)

बापाचे हे दारिद्रय बापाच्या वाडवडिलांपासून चालत आलेले आहे.

'आम्ही पिकवतो माल' ह्या कवितेत बळिराजाला शिवारात माल पिकवताना भयंकर कष्ट करावे लागतात. शिवारातील माल पदरात पडेपर्यंत कित्येक वेळा त्याचे डोळे भरतात तर कित्येक वेळा डोळ्यातून अश्रू वाहतात. दहीभाताचे रांजण करण्यासाठी अनेक प्रक्रिया कराव्या लागतात. तसे शेतात पिकणारा मालही बळिराजाच्या सहजासहजी पदरात पडत नाही. तर त्याला अनेक प्रक्रिया कराव्या लागतात.

**आम्ही पिकवतो माल** **दहीभाताचे रांजण**
**पाण्यावर वाहिलेले** **मुक्या डोळ्याचे भजन** (पृ. ८५)

बळिराजाला माल पिकविताना शिवारात कराव्या लागणाऱ्या विविध प्रक्रिया आणि या प्रक्रिया करताना त्याच्या जीवाचे झालेले हाल देशमुख मौलिक शब्दातून व्यक्त करतात.

'बळिवंत आम्ही' ह्या कवितेत बाराही महिने शिवारात राबणाऱ्या बळिराजासाठी दिवाळी दसरा नसतोच. जीवनातला प्रत्येक दिवस त्याला दिवाळी दसरा असतो. शिवारात राबताना त्याच्या हातातोंडाची वेळेवर गाठ पडत नाही. त्यामुळे त्याचे पोट कधी पाठीला तर मांस हाडाला चिकटते.

**दिवाळी दसरा** **आम्हा बारोमास**
**चिकटतो मास** **हाडावरी** (पृ. ८६

बाराही महिने शिवारात कष्टाचीच दिवाळी अन् कष्टाचाच दसरा साजरा करणारा हा बळिराजा आहे.

## ५.२ शेतकरी बापाची झालेली फरफट/ससेहोलपट :-

बेभरवशाचा निसर्ग, वर्षानुवर्षे पडणारा दुष्काळ, अवेळी पडणारा पाऊस, अशा अनेक कारणांमुळे बळिराजाच्या जीवनाची फरफट होते. बळिराजाची होणारी फरफट त्याला मरणवेदना देणारी, सदैव चिंताग्रस्त करणारी अशाच स्वरूपाची आहे. कवी श्रीकांत देशमुख यांनी 'पाणी झाले काठोकाठ', 'पिढीजात कुणबीपण', 'पांडुरंगी दुःख' इ. कवितांतून शेतकरी बापाची झालेली फरफट चित्रीत केली आहे.

'पाणी झाले काठोकाठ' ह्या कवितेत शिवारात राबणाऱ्या बळिराजाला निसर्ग कधीच साथ देत नाही. न पिकणाऱ्या शेतीमुळे जगाचा पोशिंदा हैराण होतो. पुरता वाकून जातो. दाहीदिशा त्यांच्यासाठी अंधार ठरतात. तेव्हा तो नुसता रडत नाही तर मरण अनुभवत असतो.

**कळसात ओला राघू**
**चोच पंखात टाकतो**
**तुकोबाच्या अभंगात**
**देव एकटा रडतो** (पृ. २९)

देशमुख स्वत:च्या कवितेला तुकारामाची जातकुळी समजतात.

'पांडुरंगी दु:ख' ह्या कवितेत बळिवंताचे कष्ट आणि त्या कष्टातून काहीतरी प्राप्त होईल हे इथल्या कृषिव्यवस्थेचे सूत्रच नाही. बळिराजाच्या वाट्याला बारमाही राबणं अन् राबत राबत मरणंच येतं. आपल्या आयुष्याचा होणारा हा फुफाटा जीव असेपर्यंत त्याला नजरेत साठवून ठेवावा लागतो.

**साऱ्या जन्माचा फुफाटा**
**साठवून डोळ्यात**
**नजर नासलेली** (पृ. ३४)

'पिढीजात कुणबीपण' ह्या कवितेमध्ये शेती पिकत नाही म्हणून बाप शेती सोडून किराणा दुकान थाटतो. बापाचे दुकान थाटात सुरू होते. पण हा थाट शेवटपर्यंत टिकत नाही. घरात वाढणाऱ्या पोरांचा भार दुकानावर पडतो. दुकानातून दोन पैसे उभे राहण्याऐवजी दोन पैसे दुसऱ्याचे होतात. त्यामुळे दुकानाचा मालक झालेल्या बापाच्या सदऱ्यावर कर्जाचे डाग जमू लागतात. दुकानात माल आणायलाही पैसे राहत नाहीत. बळिराजाच्या जीवनाची झालेली फरफट बळिराजाला गोत्यात आणते.

**हळूहळू बापाच्या**
**हरकच्या सदऱ्यावर**
**तेलाचे डाग जमत गेले**
**खिशात उंदराच्या लेंड्या**
**घरातल्या उंदरांची संख्या वाढत गेली** (पृ. ४१)

याच कवितेत दुकानांमुळे गोत्यात आलेला बाप अंथरूणाला खिळून पडतो. अशा अवस्थेतही तो पोराला दुकानात माल किती राहिला ? असा प्रश्न करतो. तेव्हा दुकानातल्या रिकाम्या डब्यात फक्त उंदराच्या लेंड्या आहेत. असे उत्तर प्रश्नकर्त्या बापाला पोरगा देतो. अशा वेळी अंथरूणावर खिळलेला बाप, बाप राहत नाही.

**पायरीचे निसटले दगड**
**बाप उठवणीला आला**
**मरताना त्यान विचारलं**
**दुकानात माल किती उरला ?**
**डब्याची उलथापालथ केली**
**तेव्हा दिसलं**
**डबे उंदराच्या लेंड्यांनी पाऽर भरून गेलेत** (पृ. ४१)

नागनाथ कोतापल्ले म्हणतात - ''राबणारा तरीही हतबल मग या हतबल अवस्थेतून सुटण्यासाठी त्याला कधीतरी दुसरंच काही करावं लागतं. दुकान थाटावं असं वाटतं. कारण हा व्यापारी तर आपल्याला लुबाडतो हे त्यानं पाहिलेलं असतं. मग आपणच का व्यापार करू नये असं त्याला वाटणं अस्वाभाविक कसं म्हणता येईल ? मग तो पोराच्या मदतीनं दुकान लावतो. परंतु शेतकऱ्याला व्यापाऱ्याचं गणित कसं कळावं यातून पुन्हा फरफटच होत जाते.''[३]

## ५.३ गाव-शिवाराचा समग्र आविष्कार :-

समुहाच्या बळावर गावाची निर्मिती होते. गावातील प्रत्येक मनुष्य गावापासून कितीही दूर असला तरी तो गावाशी बांधलेला असतो. गावावर, गावपांढरीवर त्याचा खूप जीव असतो. गाव जसा माणसांचा असतो तसाच जनावरांचा, चिमण्यापाखरांचा, कुत्र्यामांजरांचा, आल्यागेल्याचा असतो. गावाला हजारो वर्षाचा इतिहास असतो. तशी स्वत:ची म्हणून गावाला एक संस्कृतीही असते. अशा गावाचे गावपण आणि समग्रपण कवी श्रीकांत देशमुख यांनी 'सार्वभौम आभाळ', 'रानापलीकडचं मैदान', 'खेडं', 'वारा', 'गाव', 'रांडपण' इ. कवितेतून प्रकट केले आहे.

'गाव' ह्या कवितेत गावाचे समग्रपण प्रकट केले आहे. समुहभावनेवर जन्मलेला गाव, नुसत्या मानवी समुहांचा सांगडा नसतो तर गुरंढोरं, माणसं, वावार, शिवार, पशू, पक्षी यांनी गजबजलेला असतो. त्यामुळे गाव हा अमुक एका घटकांनी बनलेला नसतो तर त्यात असंख्य घटक समाविष्ट असतात. या घटकाविना गावाची कल्पनाच करता येत नाही.

**गाव नुस्ताच गाव नसतो कधी**
**गावात असतात माणसं, गुरंढोरं**
**असतं शिवार गावाला**
**शिवारात असते माती**
**मातीवर तरारून येतात कणसं** (पृ. २७)

नागनाथ कोतापल्ले म्हणतात - ''गाव हा जसा माणसांचा असतो तसा जनावरांचा असतो. आणि तो पाखरांचाही असतो. गाव, गावातील माणसं, भोवतीचं शेत आणि सारा परिसर पशू आणि पक्षी, पाणी आणि वारा आणि अशाच असंख्य गोष्टी मिळून ही सारी समग्रता सिद्ध होते. ही समग्रता नसेल तर गाव नसतोच म्हणून गाव समजून घेणे म्हणजे ही समग्रता आपल्यात मुरवून घेणे असते. अशी गावाची समग्रता देशमुख यांच्या व्यक्तीमत्त्वात मुरून गेली आहे.''[४] अशा गावाच्या समग्रतेमुळेच गाव माणसांच्या तनामनात घर करून राहतो.

'सार्वभौम आभाळ' ह्या कवितेमध्ये समुहभावनेवर उभा राहिलेला गाव एकछत्र आभाळाखाली गुण्यागोविंदाने नांदत असतो. या समुहभावनेवरच गावाचे गावपण सुरक्षित असते. प्रस्तुत कवितेतील 'भरगच्च आभाळ' म्हणजेच गावातील कृषिजनसमुह होय. गावाचा, गावातील कोणत्याही घटकाचा अलग-अलग विचारच करता येत नाही.

**आपण सर्वच जण**

**नांदत असतो**

**एकछत्र आभाळाखाली तसं**

**गावालाही असतं**

**त्याच्या मालकीचं असं**

**सार्वभौम भरगच्च आभाळ** (पृ. १३)

राजन गवस म्हणतात - ''या सार्वभौम भरगच्च आभाळामुळेच गावाचे गावपण शाबूत असते. या सार्वभौमत्वाला धक्का पोहचविणे गावाला मान्य नसते. आपल्या परंपरा, प्रथा यांची जपणूक गाव आत्मीय भावाने करत असतो. पर्यायाने या गावातील माणसं हे गावपण सांभाळत असतात.''[५] कवी देशमुख गावाच्या समग्रपणाचा शोध अशा पद्धतीने घेतात.

'रानापलीकडचं मैदान' ह्या कवितेत दुष्काळामुळे गावावर आणि पर्यायाने गावातल्या माणसांवर संकट येते. त्यांच्या जगण्याचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे लोकांना गाव सोडण्याशिवाय पर्याय राहत नाही. दुष्काळामुळे माणसांचे थवेच्या थवे जगण्यासाठी गावाबाहेर पडतात. अशावेळी गावाचं दुःख अनावर होतं कारण गावातल्या प्रत्येक माणसाचं आयुष्य गावाला ठाऊक असतं.

**कोसाकोसांत**

**माताळल्या फांदीवर**

**माणसांचे थवे**

**साऱ्याचे आयुष्य गावाला ठावे** (पृ. १४)

कवी देशमुखांचे गावाविषयी आकलन किती प्रगल्भ आहे याची प्रचिती येते.

'खेडं' ह्या कवितेत खेड्याचं विविधांगी रूप प्रकट करताना देशमुख म्हणतात. खेड्यातील घरंदारं ही मातीची असतात, खेड्यातील वैशाखी ऊन खेड्याचा राकटपणा, कणखरपणा प्रकट करणारं

असतं, खेडं शहरासारखं ठाकठीक नसतं तर कुणाचं घर पडलेलं, कुणाचं पत्रं उडालेलं, कुणाची भिंत पडलेली तर कुणाच्या घराला दार नसलेलं असं पडझडीचे खेडं असतं. अशा खेड्यावर जेव्हा संकट येते तेव्हा हेच पडझडीच खेडं संपूर्ण ताकतीनिशी गावाच्या संकटनिवारणासाठी उभं राहतं. एखादं गाव आपल्यावर अन्याय करीत असेल तर त्या गावालाही झोडायला हे खेडं मागेपुढे पाहत नाही. अशा खेड्यात अनेक भटके लोक येतात, जगतात, राहतात अन् निघूनही जातात. अशा आल्यागेल्याचे खेडं हा आसरा, निवारा असतो.

**खेडं**
**मातीचं**
**वैशाखी वातीचं**
**पडझडीचं**
**गावझोडीचं**
**आल्यागेल्याचं** (पृ. १५)

'रांडपण' ह्या कवितेत गावाचा गोतावळा विधवा बाईच्या दु:खाला हलकं करण्याचा प्रयत्न करतो. तिला धीर देतो. गावाच्या या सहानुभूतीबळावरच ती दु:खाचे संकट सहज झेलते. गावांपुढे आदर्श असलेल्या बाईला कधीही म्हाताऱ्या न होणाऱ्या गावाचं आयुष्य लाभण्यासाठी सारा गाव तिच्यासाठी प्रार्थना करतो.

**बाई**
**असं हे चालायचंच**
**तुला लाभो गावाचं आयुष्य**
**गावासारखीच तू कधीही**
**होऊ नये म्हातारी** (पृ. ४३)

विधवा स्त्रीच्या दु:खात सामील झालेला अन् दु:खाला बांधील असलेला गाव श्रीकांत देशमुखांनी चित्रीत केला आहे.

## ५.४ महाराष्ट्रातील सांस्कृतिक संचिताचा आविष्कार :-

संपूर्ण महाराष्ट्राची पंढरपूरच्या विठूरायावर असीम भक्ती असते. पंढरीचा विठ्ठल म्हणजे साक्षात परमेश्वर. या परमेश्वराचे दर्शन झाले की, प्रत्येक भक्ताचे मन हलके फुलके, मोकळे होते. दु:खाने जड

झालेलं मन हलकं करण्याचं ठिकाण म्हणजे पंढरीचा विठ्ठल. अशा विठ्ठलावर बळिवंताची प्रगाढ भक्ती आणि निष्ठा असते. विठ्ठल बळिवंताच्या जगण्याचं बळ असतो. म्हणूनच आषाढी कार्तिकेला न चुकता हा बळिराजा पंढरपुरात दाखल झालेला असतो. कवी देशमुख उभ्या महाराष्ट्राचे श्रद्धास्थान असलेले पंढरपूर आणि पंढरपूरच्या विठूरायाला बळिराजाच्या वास्तवजीवनानुभवातून प्रतिबिंबित करतात. कवी देशमुखांच्या 'गोदावरीकाठ', 'गावाची पंढरी', 'धाव देवा आता', 'बळिवंत आम्ही' इ. कवितांतून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक संचिताचा आविष्कार झाला आहे.

'गोदावरी काठ' ह्या कवितेत बळिराजाचे काळ्या आईवर जेवढे प्रेम तेवढेच त्याचे विठूरायावर असते. काळी आई पिकली नसली तरीही बळिराजा पंढरीची वारी चुकवीत नाही. कारण ही वारी त्याच्या वाडवडिलांपासून चालत आलेली आहे. बळिराजा आपल्या वाडवडिलांचा वारसा पंढरीला जाऊन अतिशय भक्तीभावाने जपतो. खिशाने रिता असतानाही आणि संपूर्ण जीवनच वैराण वाळवंटाने काठोकाठ भरलेले असतानाही तो पंढरीची वाट धरतो, तोच प्रेमापोटी.

**पंढरीचा विठा**
**पायरीची वाट**
**रिते काठोकाठ वाळवंट** (पृ. ६४)

पंढरीचा विठ्ठल म्हणजे साक्षात परमेश्वर. या परमेश्वराचे दर्शन झाले की त्याचे मन हलके होते. दु:खाने काठोकाठ भरलेला बळिराजा विठ्ठलाच्या दर्शनाने रिकामा होतो. म्हणून पंढरीचा विठ्ठल त्याच्यासाठी दु:ख हलके करण्याचे ठिकाण ठरतो. त्यासाठीच आषाढ कार्तिकेचा पाश तो अंगाला लावून घेतो.

**आषाढ कार्तिक**
**लावोनिया फास**
**कंठाचाच शोष अभंगाला** (पृ. ६४)

बळिराजा कितीही कंगाल झाला, रिता झाला तरीही तो आपल्या जिवाभावाच्या पंढरीरायाला विसरत नाही.

'धाव देवा आता' या कवितेत समुहबळावर उभा असलेला गाव अनेक रूढी, परंपरा, श्रद्धांनी युक्त आहे. म्हणून सायंकाळी देवळातली घंटा वाजली की सारा पार देवळातल्या प्रार्थनेला हजर राहतो. गावाची ही असीम भक्ती गावाच्या विद्रुप अंधारातही अविरत टिकून राहते. यातून गावाची संस्कृती सिद्ध होते.

**घंटा घणाणली**

**फाटला अंधार**

**ओसंडला पार सांजवेळी** (पृ. ८२)

'आम्ही बळिवंत' ह्या कवितेत शिवारात राबणं बळिराजासाठी मरण अनुभव असतो. मरण अनुभव जगत असतानाही तो रूढी परंपरेने आलेले सण साजरे करतो. म्हणूनच शिवारात दावणीला मरण बांधलेले असतानाही तो गुढीच्या दिवशी घराला आनंदाने तोरण बांधतो.

**उभारली गुढी बांधली तोरणे**

**आणिक मरणे दावणीला** (पृ. ८६)

रूढी, परंपरा प्रिय असलेला बळिराजा कवी देशमुखांनी चित्रबद्ध केला आहे.

## ५.५ सोशिक, विद्रोही व दातृत्ववान बाप :-

कवी श्रीकांत देशमुख यांनी 'बाप' या प्रतिमेतून शेतात कष्ट करणाऱ्या शेतकऱ्याला प्रतीत केले आहे. शेतात निंदणारा बाप कधी हळवा, दुबळा, भाबडा, दरिद्री, सोशिक, कष्टाळू, श्रद्धाळू तर कधी विद्रोही अशा अनेकविध भूमिका पार पाडतो. अशा बापाला कवी देशमुखांनी 'बारमाही', 'गोंदावा नांगर', 'विठा औतकरी', 'कासोटा', 'झालो तुकाराम', इ. कवितांतून चित्रीत केले आहे.

'बारमाही' ह्या कवितेत दुष्काळामुळे निसर्गाचा होत चाललेला ऱ्हास, शिवाराला आलेले माळाचे रूप आणि हे सगळे घडत असताना बळिराजाच्या आतड्याला पडलेला पीळ हे सगळेच बळिराजाला अस्वस्थ करून सोडणारे आहे. अशा अवस्थेत बळिराजा कोणत्याच गोष्टीविषयी काहीच बोलत नाही.

**नुसता नुसताच राहावा पाहत**

**निसर्ग संहार**

**माळावर झडत जाणारा** (पृ. ११)

राजन गवस म्हणतात - ''हा निसर्गसंहार त्यांच्या जीवनात सतत घडणारा त्याच्या जगण्याची उलथापालथ करणारा, पण हा शेतकरी निमूटपणे सारे सोसणे, स्वीकारणे प्राक्तन समजून झेलत असतो.''[६] बळिराजा राबणे, खपणे आणि भरडणे हेच आपलं जगणं आहे असे समजून तो दु:खाचे सगळे आघात सोशित राहतो.

'बाप जन्मला तेव्हा' ह्या कवितेत बाप शिवारात पेरणी करतो तोच मुळी माणसाला नाही तर निदान गुराढोराला, पाखराला, चारापाणी, दाणा मिळेल आणि त्यांचे जगणे चार दिवस लांबेल या अपेक्षेने. पण पाऊसच येत नाही तेव्हा बाप नागवा फटिंग होऊन आभाळाला शिव्याशाप देतो. अशावेळी त्याच्या मदतीला वेचल्या दाण्याची परतफेड म्हणून पाखरंही येतात.

**तशातही त्यानं रूजवला दाणा**

**पाखराच्या अस्तित्वासाठी**

**नागवाफटिंग होऊन**

**बसला बांधावर**

**आभाळाला शाप देत**

**तेव्हा वेचल्या दाण्याची**

**परतफेड म्हणून**

**बापासाठी पान्हावलेली पाखरं**

**मी पाहिलेली आहेत**

**ढेकळांच्या निर्वाण गर्दीत**

**गळत्या पानांच्या झाडफांद्यावर** (पृ. ४०)

पावसाळी जखमांनी हैराण झालेल्या विद्रोही बापापुढे या जखमा नष्ट करण्यासाठी कोणताच उपाय सापडत नाही हेच बळिराजाचे दु:ख आहे.

'विठा औतकरी' ह्या कवितेत बळिराजाच्या चिमणी, कावळा, गाय, म्हैस, वासरू, बैल, किडा, मुंगी, कोंबडी या पशू पक्ष्यांवर खूप जीव आहे. हा जिवाभावाचा गोतावळा जगविण्यासाठी तो अतोनात काळजी घेतो. बळिराजाच्या जीवनातील दिवस कितीही पडझडीचे असो तो दारात चिवचिव करीत येणाऱ्या चिमणीला दाणा टाकल्यावाचून राहत नाही. चिमण्यापाखरांना पोसणे तो आपले कर्तव्य समजतो.

**ओसरीत दाणा**

**चिमणी पोसावी**

**चोच सांभाळावी दिवसाची** (पृ. ६८)

चिमण्यांना दाणा भरविणारा हा बळिराजा कावळ्यालाही पिंडदानासाठी आवर्जून बोलवतो आणि जगाचा

पोशिंदा या आपल्या संज्ञेला पात्र ठरतो. जग या समग्रतेत माणूस, पशू, पक्षी, प्राणी या जाती समाविष्ट आहेत. या समग्रपणाला कवेत घेणारा हा दातृत्ववान बळिराजा आहे.

**पिंडदानासाठी**

**कावळा बोलवा**

**डोळाही जपावा** **कोपरीत** (पृ. ६८)

'कासोटा' ह्या कवितेत बळिराजाचा राग केवळ पावसांवर आहे असे नाही तर त्याला अडवणाऱ्या, नाडविणाऱ्या, फसविणाऱ्या सरकारी व्यवस्थेवर अन् सावकारी पाशावर आहे. म्हणूनच आभाळाला बडविल्यानंतर आणि पावसाला झोडल्यानंतर तो आपली मोहीम गावातल्या चावडीकडे वळवितो अन् सरकारी अधिकाऱ्यांपासून ते सावकारांपर्यंत सगळ्यांनाच फासावर चढविण्याची भाषा करतो. 'गढीचे भूत' हे शोषण करणाऱ्या व्यवस्थेचे प्रतीक म्हणून आलेले आहे.

**गढीतल्या भुता**

**द्यावा गळफास**

**कोंडलेला श्वास** **दारोदार** (पृ. ७७)

## ५.६ गावापासून तुटलेपणाची अन् त्यातून आलेल्या एकाकीपणाची जाणीव :-

सार्वजनिक शिक्षणाचा प्रसारआणि प्रचार तळागाळापर्यंत जाऊन पोहचला आणि कुणब्याची पोरं शिक्षणासाठी शहरांकडे धाव घेऊ लागली. दरम्यान तिथेच ती व्यवसाय करू लागली. त्यामुळे गावापासून,शिवारापासून अन् रक्ताच्या गोतावळ्यापासून कुणब्याचा पोरगा तुटला. या तुटलेपणामुळे कुणब्याच्या पोराच्या वाट्याला एकाकीपणा आला. त्यामुळे त्याच्या मनात एकप्रकारची अस्वस्थता निर्माण झाली. कवी देशमुख यांनी गावापासून तुटलेपणाची अन् त्यातून आलेल्या एकाकीपणाची जाणीव 'जखम', 'आम्ही पिकवतो माल' ह्या कवितेतून चित्रीत केली आहे.

'जखम' ह्या कवितेत, कुणब्याची पोरं शिक्षणासाठी खेड्यातून शहरांकडे धाव घेतात. त्यामुळे साहजिकच ती आपल्या कृषिपरंपरेपासून, गावपंढरीपासून आणि मायबहिणीपासून पुरती तुटतात. हे तुटलेपण कुणब्याच्या पोराला चिघळत जाणाऱ्या जखमेसारखं वाटतं. त्यामुळे त्याच्या मनात एकप्रकारची अस्वस्थता निर्माण होते. ही अस्वस्थता त्याला सतत पोखरणारी, असह्य करणारी आहे.

**जखम चिघळावी**

**अन् चरत जावी सारी अंगभर शिताफीनं**

**करावं अंग उघडंवागडं सलग धडापासून**

**अगदी तसंच झालं**

**तुटलो पुरता मायबहिणीपासून** (पृ.५०)

राजन गवस म्हणतात - ''घरापासून, गोतावळ्यापासून, रक्तसंबंधियापासून तुटणं हे चिघळणाऱ्या जखमेसारखं, सततची अस्वस्थता काय हे कळतं पण त्यावर उपाय सापडत नाही. असं हे बधिरपण, खोलवर पोखरणारी अस्वस्थता. सांगताही येत नाही आणि सोसताही येत नाही. अशी विचित्र कोंडी ?''[७] कुणब्याच्या पोराला आपल्या गावशिवारापासून, रक्ताच्या गोतावळ्यापासून नाळ तोडू वाटत नाही आणि पांढरपेशा होऊनही पांढरपेशाचे जिणे अंगात मुरवता येत नाही. अशी विचित्र स्थिती खेड्यांतील बहुतेक पोरांच्या वाट्याला आलेली आहे.

याच कवितेत, खेड्यापासून तुटलेपणाची भावना कुणब्याच्या पोराला इतकी अस्वस्थ करते की, तो स्वत:च्या खोलीचे दार बंद करून घेतो आणि सिमेंटनं गच्च ताटलेल्या छताकडे पाहत आपली दृष्टी शून्यात हरवितो. हे शून्यांत हरविणे त्याला कधी व्याकूळ करते तर कधी डोळ्याच्या कडा ओल्या करतं. तसेच पोराचं खेड्यापासून दुरावणं हे पोराच्या बापाला असह्य, अस्वस्थ करणारं अन् सदैव कुरतडणारं. पण तरीही पोराच्या भल्यासाठी पोराचा बाप त्याच्या पाठीवर आशीर्वादाची थाप मारतो. त्याला निरोप देतो.

**कधी माझ्या खोलीचं बंद कोरीव दार**

**लावून सुरक्षित मी बसतो आत**

**सिमेंटनं गच्च ताठलेल्या छताकडं पाहत**

**येतो पापणीच्या कडेला**

**माळदाखाली थरथरणारा बाप**

**माझ्या दुरावण्यालाही आशीर्वाद देताना** (पृ. ५०)

राजन गवस म्हणतात - ''यातील खोलीचं बंद दार, गच्च ताठलेल्या छताकडं पाहणं या त्याच्या मानसिकतेत बदल सूचविणाऱ्या गोष्टी. पण हे बदल पचवून पार होणं त्याला पेलवणारं नाही. तो तुटला तरी बाप मात्र त्याच्या तुटण्यानं खोल दुखावून गेलेला. पण आवंढा गिळून पोराचं पुन्हा भलचं चिंतीत जाणारा.''[८] बापाचे हे उदार मन त्याला कृषिपरंपरेने दिलेलं आहे.

'आम्ही पिकवतो माल' ह्या कवितेत काळ्या आईवर बळिराजाचा खूप जीव असतो. आपल्या केलेल्या कामाला, गाळलेल्या घामाला योग्य दाम देणारी काळी आई त्याला ईमानदार वाटते. अशा ईमानदार काळ्या आईपासून त्याचा संबंध तुटतो. तेव्हा त्याचे पंचप्राण गोळा होतात.

**घाम पेरतो कुणबी　　माती राखते इमान**
**पाय खचता खचता　　मिटू लागे पंचप्राण**　　(पृ. ८५)

हे तुटलेपण जसे बळिराजाचे शिवारापासूनचे तसे पोराचे खेड्यापासूनचे आहे.

## ५.७　बळिराजाचे दु:ख, व्यथा व वेदना :-

शिवारात बारमाही राबणाऱ्या बळिराजाचे दु:ख हे विविधांगी आणि व्यामिश्रीत आहे. त्याचे दु:ख वरकरणी निरनिराळे असले तरी दु:खाच्या एकाच सूत्रात बसणारं आहे. बळिराजाच्या दु:खाचा धनी जसा निसर्ग, पाऊस, दुष्काळ आहे. तशीच इथली व्यवस्था अन् त्याचे प्रारब्ध आहे. बळिराजाचे एकूणच दु:ख बळिराजाला मरणवेदना देणारे आहे. कवी देशमुख यांनी बळिराजाच्या वाट्याला आलेले दु:ख, व्यथा व वेदना - 'शिवार', 'पाणी झाले काठोकाठ', 'आला पाऊस शिवेत', 'विहीर', 'झालो तुकाराम' इ. कवितांतून प्रतीत केल्या आहेत.

'शिवार' ह्या कवितेत आभाळ शिवारावर कोसळत नाही याची खात्री झाल्यावर गावकरी गावाची शीव ओलांडण्याची तयारी पक्की करतात. माथ्यावर पोकळ वेलांटीसारखं असणारं आभाळ पाहून गावातला म्हातारा आपल्या पोराला शाळा शिकून भलं होणार नाही, 'जिंदगीचीच शाळा झाली राजा' असं म्हणत पोरालाही गावाबाहेर जाण्याची आदेशवजा सूचना देतो.

**म्हातारा थरथरत बोलला -**
**लेका, काय करायची शाळा शिकून**
**जिनगानीचीच शाळा झाली राजा**
**कसं जाळावं पोट रया गेलेल्या मातीवर** (पृ. १९)

ही व्यथा आहे मातीत राबणाऱ्या, मातीवर निष्ठा ठेवणाऱ्या आणि मातीत भरडणाऱ्या बळिवंताची, बळिवंताच्या व्यथा वेदनांना कवी देशमुख यांनी अधोरेखीत करून बळिवंताच्या दु:खाला वाचा फोडली आहे.

'आला पाऊस शिवेत' ह्या कवितेत, गावशिवेत सुरुवातीला धो धो कोसळणारा पाऊस गावातून निघून जातो. निघून गेलेला पाऊस आज येईल, उद्या येईल म्हणून तो त्याची आतुरतेने वाट पाहतो. पण

ही बापाची आतुरता बापाला निराशेच्या गर्तेत घेऊन जाणारी आहे. हंगाम निघून गेला तरी पाऊस येत नाही. अशावेळी गेल्या हंगामातील बापाच्या अंगावरचे कोरडे ओरखडे याही हंगामात कायम राहतात. तेव्हा बापाला रडू अनावर होते.

**गेला पाऊस निघून बाप एकलाच रडे**
**गेल्या दिवसाचे त्याच्या अंगावर ओरखडे** (पृ.५३)

'फिरता पाचोळा' ह्या कवितेत बळिराजाच्या दुःखाचे व्यामिश्रीत कोन त्यांच्या गुराढोरांच्या दयनीय अवस्थेतून प्रकट केलेले आहेत. बळिराजाचे हे दुःख इतके प्रखर आहे, की म्हशीचे लेकरू तिच्यापोटात मेल्यानंतर म्हशीला ज्या मरणवेदना होतात तशाच प्रकारच्या वेदना बळिराजाला भोगाव्या लागतात.

**म्हशीचे लेकरू**
**पोटातच मेले**
**तसे आता झाले भावनांचे** (पृ. ६२)

बळिराजाच्या जीवनात माजलेला वेदनामय भावनांचा कल्लोळ कवीने अचूक शब्दांत टिपला आहे.

'विहीर' ह्या कवितेत बळिराजा आपल्या हयातीत जर कधी हसला असेल तर तो सुगीच्या दिवसात. पण सुगीच्या दिवसात तरी तो खरा सुखी, समाधानी असतो का ? याचा शोध घेतला तर या दिवसातही त्याच्या जीवनाची यातायात सुरूच असते. खळं शिंपण्यासाठी साधं पाणी मिळत नाही. तेव्हा खळं भिजविण्यासाठी त्याला आटलेल्या विहिरीतील पाणी नरोट्यात घेण्याची वेळ येते. तर कधी आसवांना जवळ करावे लागते.

**विहिरीचे पाणी**
**नरोट्यात घ्यावे**
**खळे शिंपडावे आसवाने** (पृ. ७५)

वास्तविक पाहता आसवांनी किंवा नरोट्यातील पाण्यानी खळं भिजत नाही पण ते खळं भिजविण्यासाठी त्याला करावी लागणारी ही यातायात आहे. ती पाहवत नाही. बळिराजाचे हे दुःख न सरणारं आहे.

### ५.८ पाऊस हाच ग्रामजीवनाचे सर्वस्व :-

पावसाला बळिराजाच्या जीवनात अनन्यसाधारण असे स्थान आहे. पाऊसच बळिराजाच्या जीवनाची दशा आणि दिशा ठरवित असतो. बळिराजाच्या जीवनातील सुख आणि दुःख पाऊसच

ठरवितो. कवी देशमुख यांनी बळिराजाचे सर्वस्व असलेल्या पावसाचे चित्रण 'पाहिलं आहे', 'पावसाळी जखमा', 'पावेल नवसाला पांडुरंग', 'ढेकळांची गाथा', 'असे तसे आम्ही खुरटलो', 'आला पाऊस शिवेत', 'कुणब्याचे दु:ख', 'पांदी' इ. कवितांतून केले आहे.

'पावसाळी जखमा' ह्या कवितेत, पाऊस बळिराजाच्या जीवनात कसा सर्वस्व आहे. याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे ही कविता होय. न येणाऱ्या पावसांमुळे शेती नापीक बनली, शिवार ओस पडले. त्यामुळे गुराढोरांना चारा, वैरण मिळेनासा झाला. परिणामी सारी गुरंढोरं बापाच्या गोठ्यात कोरड्या दावणीलाच उभी राहतात. अशा या पावसाळी जखमा बळिराजाला अन् पर्यायाने त्याच्या गोतावळ्याला उद्धवस्थ करतात.

**माझ्या बापाच्या गोठ्यातल्या**
**गुराढोरांना झालेल्या**
**पावसाळी जखमा**
**शेती नापीक करणाऱ्या** (पृ.४०)

'पावेल नवसाला पांडुरंग' ह्या कवितेत पावसाचे आगमन झाल्यानंतर बळिराजाच्या जीवनात घडणाऱ्या घडामोडी चित्रीत केल्या आहेत. पाऊस पडल्यानंतर बळिराजाची शेती फुलेल, शिवारातून धान्याच्या राशी घरी येतील, घर धान्याच्या कोठाराने फुलून जाईल, शिवारातल्या गुरांढोरांना हिरवा चारा मिळेल, शिवारांतील हिरवा चारा पाहून गुरांढोरांच्या कंठातून आनंदी सुर घुमेल अशा वातावरणातच, गावगाड्याची जत्राही आनंदात पार पडेल. ह्या सगळ्या गोष्टी पाऊस आल्यानंतरच्या. बळिराजाच्या जीवनात पावसाचे सर्वस्व किती महत्त्वाचे आहे याची प्रचिती खालील पद्यपंक्तीतून येते.

**मळवट भरून शेती देईल वाण**
**बहरेल गुरांढोरांच्या कंठातून प्राण**
**गावाचा वाडा देवाचा गाडा**
**शिवारभर पडेल पावलांचा सडा** (पृ.४८)

'ढेकळांची गाथा' ह्या कवितेत पाण्याअभावी शिवारातील ढेकळांची आणि ढेकळांच्या सान्निध्यात स्वत:च्या अस्तित्वाचा शोध घेणाऱ्या बळिराजाची गाथा प्रकट केली आहे. शिवारातील उघडी बोडकी ढेकळं भिजली तरच बळिराजाचं भलं होतं पण ती ढेकळंच जेव्हा कोरडी राहतात तेव्हा शिवारात उभ्या असलेल्या गायीच्या डोळ्यात पाणी उभं राहतं, कुणब्याचा दाणा ज्या पाण्यावर अवलंबून

आहे ते पाणीच मिळत नाही. अशावेळी कुणब्याच्याही डोळ्यात आणि उरात पाणी दाटून येतं. बळिराजाच्या जीवनाचं धन असलेलं आणि जलमाचाच धनी झालेलं पाणी योग्यवेळी मिळत नाही. तेव्हा त्याच्या आयुष्याला एक प्रकारचा कोरडेपणा येतो.

**जलमाची कथा पाणी ढेकळाची गाथा पाणी**
**इथं नाही तिथं नाही गायीच्या डोळ्यात पाणी**
**जलमाचा धनी पाणी कुणब्याचा दाणा पाणी**
**डोळ्यात टिचला थेंब उरात दाटलं पाणी** (पृ.४९)

तर याच कवितेत ढगांत पाणी रूसून बसल्यामुळे खोप्यातील चोचीचा जीव कुडकुडतो, बळिराजाच्या पोटातलं, माठातलं, ओठातलं पाणी आटून जातं.

**चोच खोप्यात रिकामी ओंजळीत नाही पाणी**
**कसा पोसावा दाणा ढगांत रूसलं पाणी**
**पोटात आटलं पाणी माठात मेलं पाणी**
**दारात फुटके रांजण ओठात आटलं पाणी** (पृ.४९)

'असे तसे खुरटलो आम्ही' ह्या कवितेत बळिराजा आपल्या शिवारात 'बी' पेरतो तोच मुळी आपला गोतावळा जगावा या इराद्याने. तो शिवारात 'बी' पेरतो आपला आत्मा समजून, पण बळिराजाच्या जीवाची पावसाला दया येत नाही. भर पावसाळ्याच्या दिवसात बळिराजाला अन् त्यांच्या गोतावळ्याला वैराणपण येतं. बळिराजाचं हे वैराण जीवन मरणाला बांधणारं, मरणाशी गाठ जोडणारं पावसाचे सरण रचल्यामुळे बळिराजाच्या शिवाराची राख होते. परिणामी बळिराजाच्या गायीगुरांची, पशुपक्ष्यांची, कुत्र्या-कोंबड्यांची, स्वत:च्या कुटुंबाची अवस्था मरणासन्न होऊन जाते.

**आम्ही पेरला आत्मा**
**पावसाला कळलं नाही**
**भर पावसात वैराण झालो**
**मरणाला बांधून आलो**
**सरणाला कळलंच नाही.** (पृ. ५२)

बळिराजाच्या आयुष्याची परवड कुणामुळे झाली हे त्याला समजत नाही असे नाही पण दाद कुणापुढे मागायची ? हा त्याच्यापुढील प्रश्न आहे. राजन गवस म्हणतात - "केलीच तक्रार तर आभाळाकडे,

दिलाच दोष तर नशिबाला, कोणत्याही संकटानं त्याच्या विशाल, व्यापक, सहानुभावपूर्ण जीवनदृष्टीत बदल होत नाही. उलट आपल्या पोटाला चिमटा काढून, आपल्या चिमण्यापाखरांचा, कोंबड्याकुत्र्यांचा, गायीबैलांचा गोतावळा जगवला पाहिजे म्हणून तो सारी यातायात करीत असतो. हे त्याचे जगणे असते. देशमुखांच्या कवितेत येणारे हे आत्मचरित्र सलगपणे अनुभवायलाच हवे इतके ते वैशिष्ट्यपूर्ण आहे.''[१]

'आला पाऊस शिवेत' ह्या कवितेत पाऊस बापासाठी परमेश्वर असतो. म्हणूनच पावसाचे आगमन झाल्यावर म्हातारा बाप दोन्ही हाताने टाळ्या वाजवितो. कारण पाऊस म्हाताऱ्या बापाचं रीण फेडणारा, पाऊस उभ्या जगाची भूक भागविणारा, पाऊस बापाच्या गायी म्हशींना, चिमण्यापाखरांना, कोंबड्याकुत्र्यांना चारा देणारा असतो.

**फिटवं रे बापा आता उभ्या जगण्याचं रीण**
**वाजवते टाळी टाळी पिकलेले झाडपान** (पृ. ५३)

देशमुखांच्या कवितेत पावसाच्या आगमनाची जीव लावून वाट पाहणारा असा बाप येतो, तसाच पावसाचे आगमन झाल्यावर आनंदाने टाळी वाजविणारा बापही येतो.

## ५.९ कृषिजनसमुहातील स्त्रीच्या वाट्याला आलेले जगण्याचे स्वरूप : -

कृषिपरंपरेत स्त्रीचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. तिच्याशिवाय कृषिसंस्कृतीला परिपूर्णताच येत नाही. कृषिसंस्कृतीतील स्त्री अव्याहतपणे घरीदारी, शिवारात राबत असते. या तिच्या राबण्याला अंतच नसतो. तिला कितीही दुःख झाले तरी ती व्यक्त करत नाही. तिला कितीही कष्ट पडले तरी ती तक्रार करत नाही. अशी ही सोशिक, त्यागी, अविरत राबणारी स्त्री संपूर्ण कुटुंबाचा अनमोल ठेवा असतो. कवी देशमुखांनी तिच्या वाट्याला आलेले जगण्याचे स्वरूप 'रांडपण', 'रान वाढत जाते', 'आला पाऊस शिवेत', 'विहीर' इ. कवितांतून चित्रीत केले आहे.

'रांडपण' ह्या कवितेत भारतीय कृषिपरंपरेतील सोशिक स्त्रीचे दुःख चित्रीत केले आहे. ह्या कवितेत विधवा स्त्रीच्या आयुष्यात आलेले दुःख जन्मभर साचून राहते. अन् तिला निखाऱ्यासारखे भाजून टाकते. या निखाऱ्यासारख्या दुःखाने तिच्या संपूर्ण आयुष्याचीच राख होते. तरीही राख सावरीत ती जगते आहे.

**आता तुझं रांडपण**
**जन्माला भरून आलं**
**तू सावरत बसलेली चुलीतली राख**
**निखारा शोधत येत्या भाकरीसाठी** (पृ. ४२)

विधवा स्त्रीपुढे दु:खाचा निखारा असला तरी ती घाबरत नाही. याच कवितेत कवी देशमुख विधवा स्त्रीच्या दु:खात सहभागी होतात. 'तुझं असं व्हायला नको होतं' ही त्यांची ओळ विधवेच्या तीव्र दु:खाचे प्रकटीकरण करते. तिचा निर्मळ, स्वच्छ मनाचा, धुतल्या मातीसारखा कुटुंबाचा धनी वैवाहिक सुख घेण्याच्या अगोदरच निघून जातो. ऐन तारूण्यात आलेले हे वैधव्य तिच्या जीवनात सहस्त्र वेदनांचा आगडोंब निर्माण करते. तरीही ती खचत नाही.

**तू सांगत बसायचीस**
**उन्हाळ्यातल्या रात्रीला**
**पहिली रात्र**
**न पाहताच माती धुऊन गेली** (पृ. ४२)

अशीही वास्तवाला सामोरे जाणारी पण वास्तवाला न घाबरणारी स्त्री आहे.

राजन गवस म्हणतात - "ही वाट्याला आलेली यातनागाथा पण समंजसपणे ती आपले सारे भोग दैव समजून भोगते. येणाऱ्या संकटाला सहज पेलण्याचे हे बळ तिच्यात कोठून आले ? गाव गोतावळ्याच्या आधारावर, कधी संघर्षावर टणक होत गेलेली ती आपल्या भोवतालच्या व्यापक सहानुभवावरच हे सगळे पेलत असते."[१०]

'रान वाळत जाते' ह्या कवितेत कष्टाची पूजा मांडणारी स्त्री आपली सगळी दु:खं बाजूला सारून आपल्या शिवारात, मुलाबाळांत, गायवासरात आपला जीव गुंतवून ठेवते. शिवारात कामे करताना ती ओवी गाते. या ओवीतून आपलं दु:खभरलं जगणं मांडीत राहते. या तिच्या दु:खाचं कढ उसविणाऱ्या ओवीला फक्त निसर्गच सोबती असतो. अशावेळी रानात निंदताना ओवी गाणाऱ्या स्त्रीच्या हातात रानच कधी नकळतपणे जातं बनून जाते. हे तिलाही कळत नाही.

**रानात निंदताना**
**माय**
**एकटीच ओवी गाते**
**आपसुकच रानाचं**
**काळं सावळं जातं होतं** (पृ. ५१)

अखंडपणे, अविरतपणे, राबणारी ही स्त्री कृषिसंस्कृतीचे भूषण आहे.

'आला पाऊस शिवेत' ह्या कवितेत देशमुख बापाबरोबरच 'माय' लाही प्रतिबिंबीत करतात. मायला प्रतिबिंबीत करताना तिचे खरंखुरं जगणं मांडतात. दांडाचं लुगडं नेसणाऱ्या कवतिकी मायने अनेक उन्हाळे पावसाळे आयुष्यात अनुभवले आहेत. उभं आयुष्य झडलं तरी तिला सुखासमाधानाचं जिणं जगता आलं नाही. हे तिच्या अंगावर असणाऱ्या दांडाच्या लुगड्यावरूनच लक्षात येते. अशा अनेक उन्हाळे पावसाळे अनुभवणाऱ्या कवतिकी मायला गावशिवेत आलेला पाऊस नवा वाटत नाही.

**कवतिकी माझी माय** **तिला दांडाचं लुगडं**
**उन्हापावसात न्हाली** **उभ्या आयुष्याची झड** (पृ.५३)

गावशिवेत आलेला पाऊस नवा असला तरी त्यातून नवं काही तरी उभं राहील याची कवतिकी मायला शाश्वती नाही.

'विहीर' ह्या कवितेत कृषिपरंपरेतल्या स्त्रीचा रानशिवारावर खूप जीव असतो. म्हणूनच रानाच्या वाटेनेच मला मरण येऊ दे अशी ती प्रार्थना करते.

**रानाचिया वाटे**
**येऊ दे मरण**
**जिवाचे तोरण** **ठेवोनिया** (पृ. ७४)

शिवारालाच आपलं आयुष्य समर्पित करणारी ही स्त्री शिवारालाच जीवाचे तोरण बांधण्यात आपली सार्थकता मानते.

## ५.१० पशु, पक्षी व प्राणी यांचे दर्शन :-

शिवारातील पशु, पक्षी व प्राणी हे बळिराजाच्या जिवाभावाचे सोबती असतात. हा सगळा गोतावळा बळिराजाला जगण्यासाठी बळ देतो. शिवारातील अनेक कामे या गोतावळ्याच्या साहाय्यानेच केली जातात. प्रत्येक कामात हा गोतावळा त्याच्या मदतीला धावून येतो. म्हणूनच बळिराजा शिवारात एक काकरी यांच्यासाठी अधिक पेरतो. कवी देशमुखांना 'गाव', 'आला पाऊस शिवेत', 'गोंदावा नांगर', 'बारमाही', 'आम्ही पिकवतो माल', इ. कवितांतून पशू, पक्षी, प्राणी यांचा आविष्कार झाला आहे.

'बारमाही' ह्या कवितेत दुष्काळामुळे संपूर्ण शिवार सुनंसुनं होतं, शिवारातून माणसांच्या नव्हे तर प्राण्यांच्याही पदरात काही पडणार नाही म्हणून साळुंकीनं गोचिडासाठी कलकलू नये आणि माणसांनीही काही बोलू नये असे कवी प्रस्तुत कवितेतून बजावतो.

**कलकलू नये साळुंकीनं**

**बांधावरल्या गायीच्या गोचिडासाठी**

**बोलू नये कोणीकोणीच**

**तेरवीच्या शांततेसारखं** (पृ. ११)

'गाव' ह्या कवितेत शिवारातील पशु, पक्षी, प्राणी हे बळिराजाच्या जिवाभावाचे नैतर. अशा पाखरांबरोबरच तो आपलं आयुष्य कंठीत असतो. पाखरं त्याला जगण्यासाठी बळ देतात. म्हणूनच बळिराजा आपल्या शिवारात पिकलेल्या मालाचा काहीसा वाटा त्यांच्यासाठी राखून ठेवतो. हे बळिराजाचं उदार मन पाखरं जाणून असतात. म्हणूनच ती गावभर फिरतात. या पाखरांना गावमाणसांकडून धोका नसतो की धक्का नसतो. म्हणूनच बळिराजाच्या अंगणात चिमण्यांची शाळा भरते.

**पाखरं पारखत असतात माणसांना**

**म्हणूनच फिरतात गावभर**

**किंवा जमतात गावभर चिमण्या**

**गावमाणसांवर असतो विश्वास**

**म्हणून भरते अंगणात**

**चिमण्यांची शाळा** (पृ. २७)

गावमाणसांवर विश्वास ठेवणारी पाखरं गावात तळ ठोकून गावाच्या समग्रपणाला आखीवरेखीव असा आकार देतात.

'आला पाऊस शिवेत' ह्या कवितेत शिवारात राबणाऱ्या बापाचा रानपाखरांवर खूप जीव असतो. उभ्या आयुष्यात त्याला ती घडोघडी मदत करतात. म्हणूनच तो शिवारात एक काकरी अधिक पेरतो. शिवारात पाखरांसाठी दाणे रूजविणारा बाप म्हातारा होतो. तेव्हा त्याच्या ख्यालीखुशालीसाठी रानातली मैना हजेरी लावते.

**डोळे पिकले बापाचे** **पापण्यांची झड झाली**

**ख्याली खुशाली पुसाया** **रानातली मैना आली** (पृ.५३)

उपकाराची जाणीव ठेवणारी ही कृतज्ञ पाखरं खरोखरच महान आहेत.

'आम्ही पिकवतो माल' ह्या कवितेत बळिराजा पाखराच्या प्रेमापोटी रानातल्या हौदात पाणी भरतो. तर कधी पाखरांच्या चोचींना दाणा मिळावा म्हणून शिवारात दाणा रूजवितो. म्हणूनच कवी देशमुखांना 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' म्हणणारा तुकोबा आणि पाखरांसाठी पाणी भरणारा, दाणा रूजविणारा बळिराजा यात फरक वाटत नाही. यास्तव आपल्या कवितेत ते बळिराजाला तुकोबाच्या रूपात पाहतात.

**पाणी भरतो तुकोबा पाखरांच्या चोचीसाठी**
**आज उडती रानात वाऱ्यावर थेंबगाठी**

### ५.११ मरेपर्यंत शेत आणि मरणोत्तरही शेतच हीच बळिराजाची अखेरची इच्छा :-

काळ्या आईच्या कुशीत संपूर्ण हयात घालविणारा बळिराजा काळ्या आईचा निस्सीम भक्त असतो. काळ्या आईने त्याला कितीही मरणवेदना दिल्या तरीही तो तिच्यावर भरभरून प्रेम करतो. कवी देशमुखांनी बळिराजाचे हे असीम प्रेम 'बाप जन्मला तेव्हा', 'बळिवंत आम्ही' या कवितेतून प्रतीत केले आहे.

'बाप जन्मला तेव्हा' ह्या कवितेत बापाची शिवारावर खूप निष्ठा, श्रद्धा आहे. इतकी की, पुनर्जन्म झालाच तर त्याला बांधावर बसणाऱ्या पाखरांच्या रूपात हवा आहे. ही शेतकरी बापाची शिवारावरची निष्ठा आभाळात न मावणारी आहे.

**एक सांगू**
**बापाला पुनर्जन्म आवडायचा**
**कदाचित पाखरू होऊनही**
**बांधावर येऊन बसायचा** (पृ. ३९)

नागनाथ कोतापल्ले म्हणतात - ''मरेपर्यंत शेतात काम आणि मरणोत्तर ही शेतच ही इथल्या माणसांची निष्ठा आहे. जन्मापासून मरेपर्यंत तो स्वतःला एकाच रूपात पाहतो आणि ते रूप म्हणजे शेतकऱ्याचे रूप. परंतु या बापाच्या वाट्याला सुख म्हणून काही येत नाही. हे इथले दुःख आहे.''[११]

'बळिवंत आम्ही' ह्या कवितेत शिवारात राबणारा प्रत्येक बळिवंत हा मातीचा दास आहे. मातीच आपलं जगणं अन् मरणं आहे असे मनोमन जाणून तो मातीची कास धरतो. मातीची सेवा करतो. मरण यातना, मरणवेदना देणाऱ्या मातीतच आपल्या जीवनाची सार्थकता आहे असे समजून तो मातीची कास धरतो.

**बळिवंत आम्ही मातीतले दास**
**धरलेली कास मरणाची** (पृ.८६)

## ६. 'बळिवंत' मधील आकृतिबंध :-

### ६.१ समग्र कृषिव्यवस्थेला उभं करणारा आकृतिबंध :-

कवी श्रीकांत देशमुख यांनी 'बळिवंत' मधून शेतकरी, त्याची शेतीभाती, गांव, कुटुंब, पशु, पक्षी, प्राणी, निसर्ग, पाऊस, पाणी, दुष्काळ या सर्वांना मुक्त छंदातील कथनात्मक संवादातून आणि अभंग आकृतिबंधातून अभिव्यक्त केले आहे.

'बळिवंत' मधील आकृतिबंध समग्र कृषिव्यवस्थेला अविष्कृत करणारा आहे. याची प्रचिती 'बारमाही', 'खेडं', 'शिवार', 'पांडुरंगी दुःख', 'ढेकळाची गाथा', 'रान वाढत जाते', 'गोंदावा नांगर' इ. कवितांतून येते.

'बारमाही' ह्या कवितेतून कृषिव्यवस्थेशी निगडीत असलेले - मोट, बैल, पाणी, थारोळे, हंगाम, वारा, पाखरं, ढग, साळुंकी, गाय, गोचिड, माळ इ. घटक प्रकट झाले आहेत. ह्या घटकांच्या आविष्कारामुळे देशमुखांच्या कवितेला अस्सलपणा आणि जिवंतपणा प्राप्त होतो.

**बारमाही राबणाऱ्या जीवानं, पुसू नयेत दिवस हंगामाचे**
**बुडतो दिवस कोणत्या मावळतीला घेऊ नये अंदाज याचा**
**बैल ओढतो मोट ओढावं आयुष्य तसंच**
**हंबरू नये बैलानं, थारोळ्यातल्या पाण्याच्या नावानं** (पृ.११)

'खेडं' ह्या प्रस्तुत कवितेतून देशमुख यांनी खेडं, माती, बाभूळ, पाणी, घुंगरू, धूळ, वारा, जमीनदार, भूमिहीन इ. कृषिव्यवस्थेशी निगडीत असलेले सर्व घटक आपल्या कवितेत उभे करून आपली कृषिव्यवस्थेविषयी असलेली प्रगल्भ जाणीव अधोरेखीत केली आहे.

**खेडं**
**असणारांचं नसणाराचं**
**जमिनदारांचं भूमिहीनाचं**
**गावमाणसाचं मढं**
**खांद्यावर वाहून नेणारं** (पृ.१५)

ह्या रचनेतून त्यांची सूक्ष्म निरीक्षणशक्ती, डोळस व चिंतनशील वृत्ती प्रकट होते.

'पांडुरंगी दु:ख' ह्या कवितेतून देशमुखांनी कृषिव्यवस्थेला उभं करून ग्रामीण जीवनाला बोलते केले आहे. प्रस्तुत कवितेत उनसावली, विहीर, गुरंढोरं, बैल, शेंगा, वस्ती, बायामाणसं, आडोसा, पसाभर, फुफाटा इ. घटक प्रतिबिंबीत केले आहेत.

**वाळलेल्या शेंगासारखी**
**उन्हात तडकणारी वस्ती**
**पसाभर सावली पांघरून**
**बायामाणसं**
**आडोसा धरून बसलेली** (पृ. ३४)

कवी देशमुखांनी ग्रामीण जीवनाला मुक्तछंदातून मुक्तपणे बोलते केले आहे.

## ६.२ बदलत्या खेड्याचा वेध घेणारा आकृतिबंध :-

खेडं हे भारतीय कृषी संस्कृतीचे अनमोल लेणं आहे. चालीरिती, रूढी, परंपरा यांची जपणूक करणाऱ्या खेड्यात जसे जमीनदार, सावकार आहेत तसेच शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर, बारा बलुतेदार, आलुतेदार असे असंख्य घटक आहेत. आज खेड्याला शहराचा, प्रसारमाध्यमांचा, निवडणुकांचा, राजकारणाचा, पाश्चात्य संस्कृतीचा स्पर्श झाल्यामुळे खेड्यांच्या अस्तित्वाला धक्का पोहोचला आहे. कवी देशमुखांनी बदलत्या खेड्याचा वेध 'खेडं', 'जखम' ह्या कवितेतून घेतला आहे.

'जखम' ह्या कवितेतून खेड्यातली शिकली सवरलेली पोरं शहराच्या आश्रयाला जातात. तेव्हा खेड्याच्या पोरात झालेला हा बदल टिपण्यासाठी देशमुख 'गुरं' ह्या दृश्य प्रतिमेचा अवलंब करतात. खेड्याशी असलेली नाळ तोडून शहराशी नवी नाळ जोडणं म्हणजे गोठ्यातल्या जनावराची जागा घेतल्यासारखे आहे असे खेड्यापासून दुरावलेल्या पोराला मनापासून वाटते.

**गोठ्यातल्या गुरांची जागा**
**आता मी घेतो आहे**
**प्रत्येक ऋतु करतोय प्रहार** (पृ. ५०)

'खेडं' ह्या कवितेत कवी देशमुखांची गावावर खूप श्रद्धा आहे. ही श्रद्धा आंधळेपणाची नसून डोळसपणाची आहे. कवीचे संवेदनशील मन सतत बदलत्या खेड्याची नोंद घेते. खेड्याला शहराचे आलेलं रूप, शेतकऱ्याच्या पोरांनी शेतीकडे फिरविलेली पाठ, नव्या पिढीचा जुन्या चालीरितींना

असलेला विरोध, गटातटाचे राजकारण, एकत्र कुटुंबपद्धतीचा झालेला विस्फोट, कधीकाळी धुंदफुंद असणाऱ्या खेड्याचं धगधगते बनणारे अग्नीकुंड, त्यामुळे खेड्याला आलेले नपुंसकत्व असे अनेक बदल कवी देशमुख आपल्या कवितेतून टिपतात.

**खेडं**
**तसं नपुंसकच**
**केवळ**
**अस्तित्वानं उरलेलं**
**नुसतचं कलेवरासाठी**
**भेकडपणानं जगणारं** (पृ. १६)

आज केवळ नावापुरतं आणि कलेवरासाठी जागणारं खेडं उरलं आहे, असे कवी अधोरेखीत करतात.

### ६.३ जुन्या चालीरिती नष्ट होत असल्याची जाणीव व्यक्त करणारा आकृतिबंध :-

भारतीय कृषिव्यवस्थेतील खेड्यात जुन्या चालीरितींना खूप महत्त्व आहे. बळिराजाच्या जीवनात कितीही संकटाचे, अडचणीचे, पडझडीचे दिवस आले तरीही त्याची तमा न बाळगता तो जुन्या चालीरिती, रूढी, परंपरा मनापासून जपतो. पण आज भारतीय कृषिव्यवस्थेतील खेड्यातून जुन्या चालीरिती नष्ट होत आहेत. याची जाणीव 'बळिवंत' मधून प्रखरतेने होत आहे.

'गावाची पंढरी' ह्या प्रस्तुत कवितेतून कवी देशमुख महाराष्ट्राचे सांस्कृतिक संचित नष्ट होत चालल्याची जाणीव व्यक्त करतात. पंढरीचा पांडुरंग बळिराजाच्या जगण्याचे बळ असतो. म्हणूनच तो पंढरीची एकही वारी चुकवित नाही. पण आज बळिराजाच्या आजूबाजूचे असणारे वास्तव या सांस्कृतिक संचितालाच बेचिराख करून टाकते. पहिल्यासारखा बळिराजा पंढरीला जात नाही. म्हणून गावालाच पंढरी करावे आणि गावातल्या वारकऱ्यांना एकत्र करून पंढरीचा उत्सव भरवावा. अशी देशमुख कल्पना करून बळिराजाच्या जीवनाला बळ देण्याचा प्रयत्न करतात.

**माझिया गावाची**
**करावी पंढरी**
**तसे वारकरी मेळवावे** (पृ. ६६)

'विहीर' ह्या कवितेतून 'आषाढ श्रावण' अशा प्रतीकांतून बळिराजाच्या नष्ट होत चाललेल्या परंपराविषयीची जाणीव कवीने व्यक्त केली आहे. बळिराजाला प्रत्येक हंगामाची आठवण करून देणारे मराठी महिने आज लोप पावण्याच्या मार्गावर आहेत.

**आषाढ श्रावण**
**कधी एक झाले**
**गाव उभे न्हाले पावसाने** (पृ.७४)

कवी देशमुख अशा प्रतीकांतून कृषिपरंपरा वाचकांपुढे उभी करतात ती केवळ उच्चभ्रू, मध्यमवर्गीय, लोकांना कृषिसंस्कृतीचा परिचय करून द्यायचा म्हणून नव्हे. तर वाचकांना, अभ्यासकांना नवनवीन विचार दिशांकडे घेऊन जाण्यासाठी.

'झालो तुकाराम' ह्या कवितेत थकला भागलेला बळिराजा देवळातली घंटा झाल्यावर आता प्रार्थनेला जात नाही. त्यामुळे देवळातील घंटा कैकवेळा त्या वाऱ्याशीच टक्कर देते. बळिराजाच्या देवळात न येण्याने कैवल्याचा पुतळाही हिरमुसून जातो.

**देवळाची घंटा**
**वाऱ्याशी खेटते**
**तोंडही फाटते कैवल्याचे** (पृ. ८३)

## ६.४ विचाराबरोबर चिंतनशीलतेला प्राधान्य देणारा आकृतिबंध :-

कवी श्रीकांत देशमुखांनी 'बळिवंत' मधून उत्कट भावनात्मकतेला सखोल विचारांची आणि चिंतनशीलतेची जोड देऊन समग्र कृषिव्यवस्थेला अविष्कृत केले आहे.

'गाव' ही प्रस्तुत कविता वाचकांच्या अंतर्मनाला नुसती स्पर्श करीत नाही तर वेगवेगळ्या दिशांनी विचार करायला चिंतन करायला भाग पाडते. देशमुख यांच्या कवितेच्या केंद्रस्थानी विचारांची आणि भावनांची अनेकविध वलये ठाण मांडून बसलेली आहेत.

**आपल्या बापाचं**
**आज्या पणज्याचं**
**सांगण्यासाठी नांव**
**हवा असतो गाव** (पृ. २७)

'गाव' ही साधी संकल्पना पण या साध्या संकल्पनेतच गावातील प्रत्येक माणसांचा इतिहास साठून राहिला आहे. देशमुखांची कविता एका पाठोपाठ एक अशी अनेक विचार वलये निर्माण करते. त्यांची कविता साधेपणातच सौंदर्य शोधणारी आणि वेगवेगळ्या दिशांनी विचार करायला लावणारी आहे.

कवी देशमुखांची 'जखम' ही कविता वास्तव मांडणारी, वास्तव शोधणारी मग ते वास्तव कितीही कठोर असो त्याचा स्वीकार करणारी आहे. त्यांच्या कवितेतील वास्तव नाविन्यपूर्ण, नाविन्याचा शोध घेणारे आहे.

**कधी माझ्या खोलीचं बंद कोरीव दार**
**लावून सुरक्षित मी बसतो आत**
**सिमेंटनं गच्च ताठलेल्या छताकडं पाहत**
**येतो पापणीच्या कडेला**
**माळदाखाली थरथरणारा बाप**
**माझ्या दुरावण्यालाही आशीर्वाद देताना** (पृ.५०)

खेड्यातल्या पोराचं शहरातल्या सिमेंट काँक्रेटच्या अन् सिमेंटचे छत असलेल्या इमारतीत राहणं (नवता) आणि पोराच्या खेड्यापासूनच्या दुरावण्याने माळदाखाली थरथरणारा बाप (परंपरा) या दोन घटना उभ्या करून परंपरा आणि नवता यांची सांधेजोड केली आहे. अशा पद्धतीने देशमुख नाविन्यतेवर व पारंपारिकतेवर प्रकाश टाकतात. यातून त्यांची प्रगल्भ चिंतनशीलता प्रकट होते.

'असे तसे आम्ही खुरटलो' ह्या कवितेत बळिराजाच्या जीवनात बियांना किती महत्त्वाचे स्थान आहे. हे त्यातील 'आत्मा' या प्रतिमेतून प्रतीत होते. आत्मा जसा बळिराजाच्या जीवनाचा प्राण असतो. तसा शिवारात पेरलेला दाणा ही एका अर्थाने बळिराजाच्या जीवनाचा प्राण असतो. तो जगला तरच आपण जगणार आहोत याची त्याला जाणीव असते. म्हणूनच तो त्याची जीवापाड काळजी घेतो. पण पावसाला त्याची दया येत नाही. इथे देशमुखांनी शिवारात रूजणाऱ्या दाण्याची तुलना आत्म्याशी करून दाण्याचे महत्त्व विशद केले आहे. अशा प्रतिमेतून देशमुखांची वैचारिक शक्ती आणि चिंतनशीलवृत्ती प्रतीत होते.

**आम्ही पेरला आत्मा**
**पावसाला कळलं नाही**
**भर पावसात वैराण झालो**
**मरणाला बांधून आलो**
**सरणाला कळलंच नाही** (पृ. ५२)

## ६.५ संत साहित्य व लोक साहित्याशी संदर्भ जोडणारा आकृतिबंध :-

ग्रामीण जीवनाच्या मनाशी, अंत:करणाशी एकरूप असणारे संत साहित्य व लोकसाहित्य कवी देशमुखांनी आपल्या कवितेतून उभे केले आहे.

'पावेल नवसाला पांडुरंग' ह्या कवितेत देशमुख लोकसाहित्यातील लयीचा मुक्तपणे वापर करून लोकसाहित्याला नवसंजीवनी देतात. तर संत साहित्यात समाविष्ट असलेल्या विविध घटकांचा प्रतिमा-प्रतीकांसाठी वापर करून आपल्या कवितेला संत साहित्याची व लोकसाहित्याची झालर जोडतात.

**देवळाच्या कळसाला लागेल माती**
**फुटल आभाळातून पाण्याचा घडा**
**ताडमाड फुलतील वाती पेटतील**
**चिमण्यांच्या चोची अंगणभर फिरतील** (पृ. ४८)

प्रस्तुत पद्यपंक्तीतून 'देवळाचा कळस' ही संत साहित्यातील दृश्यप्रतिमा साकार झाली आहे. बळीराजाचे कष्ट हीन नसून ते महान आहे. त्याच्या कष्टाची प्रतिष्ठा व्यक्त करण्यासाठीच देशमुखांनी 'देवळाचा कळस' ह्या प्रतिमेचा अवलंब केला आहे.

कवी देशमुख अभंग आकृतिबंधातून ग्रामीण जीवन मांडीत असले तरी या ग्रामीण जीवनाला पारंपारिकतेची झालर जोडल्याशिवाय त्यांची कविता नीटपणे उभीच राहत नाही.

**कंबर तुटली**
**हातही तुटला**
**चेहरा फाटला विठोबाचा** (पृ.६४)

'झालो तुकाराम' ही प्रस्तुत कविता वारकरी संप्रदाय आणि कृषिव्यवस्था यांच्यातील परस्पर संबंधाचे धागे उलगडून दाखविते. शिवारात अभंग कष्टाचा टाळ वाजविणारा बळिराजा शिवारापासून तुटतो. तेव्हा 'आपुले मरण पाहिले म्या डोळा जाला अनुपम सोहळा' असे म्हणणाऱ्या तुकारामाचे तो उत्तरदायित्व स्वीकारतो.

**अभंग कोळून**
**झालो तुकाराम**
**माळावर टाळ तुटलेला** (पृ.८३)

वारकरी संप्रदायाचा अनमोल ठेवा जपणारी कृषिव्यवस्था अन् त्या कृषिव्यवस्थेला उभी करणारी देशमुखांची कविता असामान्य आहे. प्रस्तुत पद्यपंक्तीतील 'अभंग', 'तुकाराम', 'टाळ' ह्या दृश्य प्रतिमा वारकरी संप्रदायातील आहेत. या प्रतिमा जरी पारंपारिक असल्या तरी त्यातून व्यक्त झालेला आशय हा आधुनिक ग्रामजीवनातील बळिराजाचे जीवन प्रतीत करणारा आहे. हेच देशमुखांच्या कवितेचे निराळेपण अन् वेगळेपण आहे.

## ६.६ प्रतिमा व प्रतीके :-

कवी श्रीकांत देशमुख यांनी समग्र कृषिव्यवस्थेला अभिव्यक्त करताना ग्रामीण जीवनातील अनेक प्रतिमा प्रतीकांचा अवलंब केला आहे.

'शिवार' ह्या प्रस्तुत कवितेतून दुष्काळामुळे उद्ध्वस्थ झालेले खेडं आणि गावापुढे निर्माण झालेल्या समस्या प्रतिमा प्रतीकांतून चित्रीत केल्या आहेत.

**बोललं आज कोणीतरी शिवारात**
**बापहो रानशिवाराचं दिवस भरत आलं**
**गावकुसात साजरं करायचं गावाचं तेरावं**
**अन्न पाण्यावाचून द्यायचाय ढेकर**
**सातासमिंदरापलीकडचा निळा वारा पिऊन** (पृ.१८)

दुष्काळामुळे उद्ध्वस्थ झालेले गाव चित्रीत करण्यासाठी कवी देशमुखांनी 'तेरावं' ह्या प्रतीकाचा वापर केला आहे. तर गाव उद्ध्वस्थ झाल्यामुळे गावांवर, जगण्यासाठी गाव सोडण्याची वेळ आली आहे. हे चित्रीत करण्यासाठी 'साता समिंदर' ही प्रतिकात्मक रचना योजली आहे.

श्रीकांत देशमुखांच्या कवितेतील 'बाप' ही प्रतिमा शेतकऱ्यांचा प्रतिनिधी म्हणून संपूर्ण कविता संग्रहात वावरते. शेतकरी जीवनाच्या चित्रणासाठी कवी देशमुख 'बाप' या प्रतिमेचा अत्यंत चपखल वापर करतात.

**सोनसळीचे दिवस आले तसे गेले**
**बाप म्हातारा झाला**
**उद्या गावकुसात**
**गाणं बहरलंच समजा**
**मेल्या बापाचं असेल** (पृ. ३९)

'पिढीजात कुणबीपण' ह्या कवितेत बळिराजाच्या वेदना उघड सांगण्यापेक्षा त्या प्रतिमेतून अविष्कृत केल्या आहेत. त्यामुळे प्रतिमांच्या माध्यमातून प्रकट केलेली बळीराजाची वेदना विचार प्रवृत्त करण्यास भाग पाडते.

**पायरीचे निसटले दगड**
**बाप उठवणीला आला**
**मरताना त्यानं विचारलं**
**दुकानात माल किती उरला ?** (पृ.४१)

प्रस्तुत पद्यपंक्तीतून 'पायरी' आणि 'दगड' या दोन दृश्य प्रतिमा संयुक्तरित्या साकार झालेल्या आहेत. किराणा दुकानामुळे गोत्यात आलेला बाप अंथरूणाला खिळून राहतो. तेव्हा तो एका अर्थाने शिवारापासून, कुटुंबापासून आणि दुकानांपासून अलग होतो. हे त्याचे अलग होणे तुटणे कवी देशमुख 'पायरीचे निसटले दगड' या संयुक्त प्रतिमेतून साकार करतात. देशमुखांच्या कवितेत अविष्कृत झालेल्या प्रतिमा ग्रामीण जीवनातल्या अन् ग्रामीण परिसरातील आहेत.

## ६.७ 'बळिवंत' मधून प्रतीत झालेले अलंकार :-

कवी श्रीकांत देशमुख यांच्या 'बळिवंत' मधून रूपक, उपमा, यमक व चेतनागुणोक्ती अलंकारांचे दर्शन घडते. 'खेडं' ह्या कवितेतून 'यमक' अलंकाराचे दर्शन घडते.

**खेडं**
**मातीचं**
**वैशाखीवातीचं**
**पडझडीचं**
**गावझोडीचं**
**आल्यागेल्याचं.**

प्रस्तुत पद्यपंक्तीतील प्रत्येक चरणांतील शेवटचे अक्षर भिन्न अर्थाने आले असल्याने यमक अलंकार अविष्कृत होतो. कवीनी यमक अलंकाराचा केलेला वापर आणि त्यातून खेड्याचे साकार झालेले असली रूप हे देशमुखांच्या लेखन सामर्थ्याचे खास वैशिष्ट्य आहे.

'वारा' या कवितेतून 'चेतनागुणोक्ती' अलंकाराचे दर्शन घडते.

**वारा गावावर येतो अन् होतो गावभर**
**विसावतो पारावर घुसतो झोपडीत**
**झोपडीसह जातो झपाट्यानं आभाळात**
**खेडं असतं मुकाट डोळे मिटून मातीवर** (पृ.२४)

प्रस्तुत पद्यपंक्तीतील 'मुकं' आणि 'डोळे' या दृश्य प्रतिमेतून खेड्याचे मानवीकरण करून चेतनागुणोक्ती अलंकार साधला आहे.

'गावाची प्रार्थना' ह्या कवितेतून रूपक अलंकाराचे दर्शन घडविले आहे.

**विहिरीचा काठ टिचलेला**
**रांडपण आलेल्या कपाळासारखा** (पृ.३४)

प्रस्तुत पद्यपंक्तीतील 'विहिरीचा काठ' हे उपमेय असून 'रांडबाई' (रांडपण) हे उपमान आहे. उपमेय व उपमान भिन्न नसून ते एकरूप आहेत. म्हणून रूपक अलंकाराचा आविष्कार झाला आहे.

'रांडपण' ह्या कवितेत 'उपमा'अलंकाराचे दर्शन घडते.

**बाई**
**असं हे चालायचंच**
**तुला लाभो गावाचं आयुष्य**
**गावासारखीच तू कधीही**
**होऊ नयेस म्हातारी** (पृ. ४३)

प्रस्तुत पद्य पंक्तीतून 'गाव' आणि 'बाई' यांच्यातील साम्य चमत्कृतीपूर्ण रीतीने वर्णन करून कवी देशमुखांनी उपमा अलंकार साधला आहे.

## ६.८ 'बळिवंत' मधील वाक्प्रचार सदृश्य रचना :-

'बळिवंत' मधून समग्र कृषिव्यवस्थेला अभिव्यक्त करताना अनेक वाक्प्रचारसदृश्य रचना अविष्कृत झाल्या आहेत. 'सार्वभौम आभाळ'ह्या कवितेतून 'दिवे विझणे' (कार्यभाग संपणे) तर 'आला पाऊस शिवेत' ह्या कवितेतून 'आकांत मांडणे' (खूप आरडाओरड करणे), 'टाळी वाजविणे' (खूप आनंद होणे) अशा वाक्प्रचार सदृश्य रचना आढळतात.

**झाडावर पाखरांनी असा आकांत मांडला**
**पाखराच्या पंखावर सारा पाऊस सांडला** (पृ.५३)

**डोळे पिकले बापाचे पापण्यांची झड झाली**
**ख्याली खुशाली पुसाया रानातली मैना आली** (पृ.५३)

**फिटवं रे बापा आता उभ्या जगण्याचं रीण**
**वाजवते टाळी टाळी पिकलेले झाडपान** (पृ.५३)

याशिवाय 'आम्हा घरी तण' ह्या कवितेतून 'पान सुकणे' (वृद्धत्व येणे), 'आयुष्य आटणे' (आयुष्य संपणे) अशा वाक्प्रचार सदृश्य रचना आढळतात. कवी देशमुख बळिराजाचे जीवन वाक्प्रचार सदृश्य रचनेतून मांडतात. त्यामुळे कवितेला विशिष्ट बाज प्राप्त होतो.

## ६.९ अस्सल ग्रामीण शब्दांचे दर्शन :-

कवी श्रीकांत देशमुख यांनी 'बळिवंत' मधून गाव, गावाच्या अवतीभोवतीचा परिसर, शेती, निसर्ग, पशू, पक्षी या समग्र कृषिव्यवस्थेला उभं करताना त्यांनी आपल्या कवितेत अस्सल ग्रामीण शब्दांचा आविष्कार केला आहे.

'पिढीजात कुणबीपण' ह्या कवितेतून 'किराणा दुकान', 'गल्ला', 'ज्वारी', 'मूग', 'डालडा', 'तेल', 'मीठमिरची', 'छटाक', 'किलोभर', 'चाराणे-आठाणे', 'गोळ्या', 'गूळ', 'लेंड्या', 'डबे', असे अनेक अस्सल ग्रामीण शब्द प्रतीत झाले आहेत. त्यामुळे देशमुखांची कविता नुसती ग्रामीण राहत नाही तर ती अस्सल ग्रामीण ठरते. म्हणूनच त्यांची कविता सर्वस्वी वेगळी आहे.

**चाराण्याच्या गोळ्या**
**आठाण्याचा गूळ**
**मीठ मिरची**
**किलोभर ज्वारी**
**छटाक डालडा** (पृ.४१)

याशिवाय 'आला पाऊस शिवेत' ह्या कवितेतूनही 'शीव', 'गाडा', 'वाडा', 'माय', 'उनपाऊस', 'लुगडं', 'पास', 'काबाड', 'ख्यालीखुशाली', 'झड', 'बाप', 'वीण', 'रीण', 'टाळी', 'झाडपान', 'ठेका', 'सालगडी' इ. अनेक शब्द साकार झाले आहेत.

## ६.१० 'बळिवंत' मधील आविष्कार स्वरूप :-

कवी श्रीकांत देशमुख यांनी 'बळिवंत' या काव्यसंग्रहातून बळिराजाचा जीवनानुभव आणि समग्र कृषिव्यवस्थेला अस्सल ग्रामीण बोलीतून अविष्कृत केले आहे. देशमुखांची कविता समग्र कृषिव्यवस्थेला अभिव्यक्त करताना कधी मुक्तछंदातील कथनात्मक संवादाचा आविष्कार घडविते तर कधी अभंग आकृतिबंधाचा आविष्कार करते.

कवी देशमुखांची 'बारमाही' ही कविता मुक्तछंदातील कथनात्मक रूप धारण करते. कवी देशमुख बळिराजाचे दु:ख, त्याच्या जीवनाचे सगळे संकेत अगदी मुक्तपणे मांडत राहतात. त्यामुळे अशा कवितेतून अलंकार, वृत्ते आपोआप गळून पडतात. अलंकार, वृत्ते यांनी बंदिस्त असलेली कविताच प्रभावी होते असे नाही तर मुक्तछंदातून व्यक्त केलेली कृषिजाणीवही प्रभावी ठरते. याचा पुरावा त्यांची कविता देते.

**कलकलू नये साळुंकीने**
**बांधावरल्या गायीच्या गोचिडासाठी**
**बोलू नये कोणीकोणीच**
**तेरवीच्या शांततेसारखे** (पृ.११)

देशमुखांच्या कवितेला एक विशिष्ट लय आहे. या लयीमुळेच त्यांची कविता, कवितेतील विचार प्रभावी ठरतो. त्यांच्या कवितेतील शब्द साधेच आहेत. पण ते साधेच शब्द कवितेला सौंदर्य प्राप्त करून देतात.

देशमुखांच्या कवितेची रचना वरकरणी साधी वाटत असली तरी अंतर्यामी ती बळिराजाच्या जीवनाचा तळ शोधताना दिसते. देशमुखांची संपूर्ण कविताच बळिराजाच्या ताणतणावासह उभी राहते.

**सोनसळीचे दिवस आले तसे गेले**
**बाप म्हातारा झाला**
**उद्या गावकुसात**
**गाणं बहरलंच समजा**
**मेल्या बापाचं असेल** (पृ.३९)

देशमुखांची कविता रसिक मनात कल्लोळ माजविते. हृदय हेलावून सोडते. त्यांची कविता वाचताना कंठ दाटून येतो. डोळ्याच्या कडा पाणावतात. अशी ही साधी, सरळ, सोपी, समृद्ध आणि संपन्न आशयघन असलेली त्यांची कविता वाचकांच्या मनाचा ठाव घेते.

कवी देशमुख कवितेतून कधी स्वत:शी, तर कधी बळिराजाशी संवाद साधतात. अशा संवादातून बळिराजाला कधी आधार, धीर देतात. तर कधी उपदेशही करतात. तर कधी स्वत:च त्याच्याविषयी कल्याण चिंततात. ही कवीची आशावादी वृत्ती बळिराजाची मनोभूमिका बळकट करते. शिवाय यातून त्यांची स्वतंत्र जीवनदृष्टीही प्रतीत होते.

**कधी तरी पावेल नवसाला पांडुरंग**
**तू दमू नकोस, भागू नकोस**
**लिंबोणीच्या झाडाआड मरू नकोस**
**थकलेली नातीगोती गाडू नकोस** (पृ.४८)

कवी श्रीकांत देशमुख आपल्या कवितेतून अभंग आकृतिबंधाचा आविष्कार घडविताना लहान आणि मोठ्या अभंगाचा अवलंब करतात. देशमुखांच्या कवितेतील चौपदी संत साहित्यातील लहान व मोठ्या अभंगाचे अनुकरण करते.

''मोठ्या अभंगात चार चरण असून पहिल्या तीन चरणांत सहा अक्षरे व चौथ्या चरणांत चार अक्षरे असतात. दुसऱ्या व तिसऱ्या चरणांत यमक असते.''

**लक्ष्मण भावोजी । मागे पुढे स्वामी । मज आहे धामी । ऐसे वाटे ।** (६।६।६।४)

''केव्हा केव्हा मोठ्या अभंगातील चार चरणांतील पहिल्या तीन चरणांत यमक असते.''

**जाणावा तो ज्ञानी । पूर्ण समाधानी । नि:संदेह मनी। सर्वकाळ** (६।६।६।४)

''लहान अभंगाला दोन चरण असतात व प्रत्येक चरणांत सामान्यत: आठ अक्षरे असतात. पहिल्या चरणांत सहा किंवा सात अक्षरे असतात. दुसऱ्या चरणांत केव्हा केव्हा नऊ किंवा दहा अक्षरे असतात.''[१२]

**अर्भकाचे साठी । पंते हाती धरिली पाटी ।**
**तुका म्हणे नाव । जनकासाठी उदकी ठाव।** (६।९।६।१०)

लहान व मोठ्या अभंगात असलेली सर्व लक्षणे कवी देशमुखांच्या अभंगरूपी कवितेत आढळतात.

**कळसात ओला राघू। चोच पंखात टाकतो**
**तुकोबाच्या अभंगात । देव एकटा रडतो** (लहान अभंग-८।८।८।८)

**आम्हा घरी तण**

**अंधाराचे धन**

**डोळ्यातले पान सुकलेले** (मोठा अभंग - ६।६।६।४)

अशी देशमुखांची कविता वेगळेपण दाखविणारी, सर्वस्वाने निराळी असणारी अन् वाचकांना वेगवेगळ्या विचारांच्या वाटा चोखाळायला प्रवृत्त करणारी अशीच आहे.

**निष्कर्ष :-**

१. कवी श्रीकांत देशमुख समग्र कृषिव्यवस्थेला कवितेतून अविष्कृत करतात.

२. कवी देशमुख बदलत्या खेड्याचा वेध कवितेतून घेतात.

३. कवी देशमुखांची कविता नुसती विचारप्रवृत्त करीत नाही वाचकाला चिंतनशील बनवते.

४. कवी श्रीकांत देशमुख प्राणिजीवनातील भावविश्व अधोरेखीत करून कवितेला जिवंतपणा आणतात.

५. कवी देशमुखांच्या कवितेचे शीर्षक कोणतेही असो त्या कवितेतून बळिराजाचे दु:ख केंद्रस्थानी राहिले आहे.

६. कवी देशमुखांनी प्रतिमा प्रतीकांतून व्यक्त केलेला अर्थ विकासाच्या दृष्टिकोनातून प्रतित होतो.

७. कवी देशमुखांची कविता जितकी संयमी आहे तितकीच ती विद्रोही आहे.

८. देशमुखांची कविता राबणाऱ्यावर निष्ठा असणाऱ्यांची आणि राबता राबता नष्ट होणाऱ्या माणसांची कविता आहे.

९. प्रतिमा, प्रतीके व अलंकार हे त्यांच्या कवितेचे सामर्थ्य आहे.

१०. संतसाहित्य व लोकसाहित्याशी नाते जोडणारी देशमुख यांची कविता आहे.

११. कवी देशमुखांची प्रगाढ कल्पनाशक्ती, मानवी जीवन आकलनाची सूक्ष्म दृष्टी, डोळस भूमिका व चिंतनशील वृत्ती कवितेतून प्रकट होते.

## संदर्भ ग्रंथ


| | | | |
|---|---|---|---|
| १. | देशमुख श्रीकांत | - | 'बळिवंत' (शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, तिसरी आवृत्ती - २००६, मलपृष्ठ) |
| २. | कोतापल्ले (डॉ.) नागनाथ | - | 'मराठी कविता : आकलन आणि आस्वाद' (स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद - ४३१००३, प्रथमावृत्ती, पृ. २५८) |
| ३. | देशमुख श्रीकांत | - | 'बळिवंत', उनि (परिशिष्ट एक - 'बळिवंत' : बळिवंताच्या दु:खाची गाथा - कोतापल्ले (डॉ.) नागनाथ, पृ.९१) |
| ४. | कोतापल्ले (डॉ.) नागनाथ | - | 'मराठी कविता : आकलन आणि आस्वाद' (स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद - ४३१००३, प्रथमावृत्ती, पृ. २६५) |
| ५. | देशमुख श्रीकांत | - | 'बळिवंत', उनि (परिशिष्ट दोन - 'बळिवंत' : समकालीन कृषिजनसमुहाचा उद्‌गार - गवस राजन, पृ. १०२) |
| ६. | देशमुख श्रीकांत | - | 'बळिवंत', तत्रैव (परिशिष्ट दोन - 'बळिवंत' : समकालीन कृषिजनसमुहाचा उद्‌गार - गवस राजन, पृ. १००) |
| ७. | देशमुख श्रीकांत | - | 'बळिवंत', तत्रैव (परिशिष्ट दोन - 'बळिवंत' : समकालीन कृषिजनसमुहाचा उद्‌गार - गवस राजन, पृ. १०७) |
| ८. | देशमुख श्रीकांत | - | 'बळिवंत', तत्रैव (परिशिष्ट दोन - 'बळिवंत' : समकालीन कृषिजनसमुहाचा उद्‌गार - गवस राजन, पृ. १०८) |

९. देशमुख श्रीकांत - 'बळिवंत', तत्रैव (परिशिष्ट दोन - 'बळिवंत' : समकालीन कृषिजनसमुहाचा उद्गार - गवस राजन, पृ. १०२)

१०. देशमुख श्रीकांत - 'बळिवंत', तत्रैव (परिशिष्ट दोन - 'बळिवंत' : समकालीन कृषिजनसमुहाचा उद्गार - गवस राजन, पृ. १०७)

११. कोतापल्ले (डॉ.) नागनाथ - 'मराठी कविता आकलन आणि आस्वाद',उनि. (स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद - ४३१००३, प्रथमावृत्ती, पृ. २५९)

१२. वाळंबे (कै) मो. रा. - 'सुगम मराठी व्याकरण लेखन', नितीन प्रकाशन, पुणे - ४११ ०३०, आवृत्ती जानेवारी २००५, पृ.१६६.

-----x-----